ISSN 2231-1629
Knowledge Resonance

# भारतातील औद्योगिक कामगारांचा चिकित्सक अभ्यास

प्रा. डॉ. प्रमिला डी. भोयर,
(सहा. प्राध्यापक) इतिहास विभाग प्रमुख
स्व.निर्धन पाटील वाघाये कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,लाखनी, जि.भंडारा

**प्रस्तावणा :-**

प्राचीन काळापासून भारत हा कृषीप्रधान व खेडयांचा देश आहे. भारतात 80ः लोक शेती करतात व शेतीला जोड धंदा म्हणुन पशुपालन व छोटे-मोठे लघुउद्योग व कुटीरउद्योग करायचे. प्राचीन काळापासून म्हणजेच सिंधू संस्कृती काळापासून भारतात शेती व्यवसाय चालत आला आहे. पूर्वी खेडी ही स्वयंपूर्ण होती. गावात बारा बलुतेदार होते. गावातील लोकांच्या गरजा गावातच भागत होत्या किंवा पूर्ण होत होत्या. छोटे - मोठे व्यवसाय करणारे कारागीर गावातच होते. पैशांऐवजी वस्तूविनीमय पध्दत अस्तीत्वात होती.

भारतात कुटीर उद्योग, लघुउद्योग व हस्तकला व्यवसाय अतीशय वेगात चालत होता व देश भरभराटीला आला होता. भारतातील वस्तूंना परदेशात अतीशय मागणी होती. विशेषतः हस्तकला वस्तूंना विदेशात खूप मागणी होती. भारतातील ताग, कापूस, मसाल्याचे पदार्थ यांची मोठया प्रमाणात निर्यात होत होती.

सपन्न असलेला भारत इंग्रजांच्या आगमनानंतर 100 वर्शात दारीद्रयाच्या गर्तेत फेकल्या गेल्या. इ.स. 1612 मध्ये इंग्रजंनी मोगल बादशहा जहॉगीरकडून व्यापारी सवलती मिळविल्या आणि नंतर सुरत येथे पहिली वखार स्थापन करून आपला माल इंग्लंड वरून सागरी मार्गाने आणून वखारीमध्ये साठवून ठेवीत व नंतर तो विकत. इंग्रजी माल यंत्रावर तयार होत असल्यामुळे दिसायला भारतीय मालापेक्षा चांगला दिसायचा त्यामुळे इंग्रजी मालाकडे भारतीय लोक आकृष्ट होवू लागले भारतीय माल मागे पडू लागला परिणामी भारतातील लघुद्योग व कुटीरउद्योग बंद पडण्याच्या मागार्वर आले. त्यामुळे कारागीर बेकार होवू लागले.

भारतामध्ये अनेक युरोपीयन राष्ट्रानी व्यापार केला परंतू इंग्रजांनी ईस्ट इंडीया कंपनी स्थापन करून 1757 च्या प्लासीच्या लढाईनी बंगाल प्रांतात आपले राजकीय स्थान स्थापन केले. 1875 पर्यंत जवळपास संपूर्ण भारतावर इंग्रजांचा अमल सुरू झाले आणि भारत हा इंग्रजांचा गुलाम बनला.

इंग्लंडमध्ये लागणाऱ्या कच्च्या मालासाठी त्यांनी भारतीयांना जबरदस्तीने नगदी पीके घेण्यास दबाव आणला त्यामुळे भारतामध्ये अन्न धान्याची टंचाई निर्माण झाली व त्यामुळे ग्रामीण भागातील हया निर्माण झालेल्या मजुरांनी अन्नाची सोय व्हावी म्हणून शहराकडे धाव घेतली त्यातूनच औद्योगिक कामगाराचा उदय झाला. हया औद्योगिक कामगारांचे उदय होण्यास अनेक परिस्थिती कारणीभूत आहे. ती पुढीलप्रमाणे -

**भारतीय उद्योगांचा ऱ्हास :-**

इंग्लंडमध्ये/युरोपीय देशांमध्ये औद्योगिक क्रांती सुरू झाल्यामुळे त्याचा परिणाम हा इतर देशावर होऊ लागला. यंत्राचा वापर सुरू झाल्यामुळे दहा व्यक्तीचे काम एक यंत्र करू लागले तेव्हा ते दहा व्यक्ती बेकार झाले. यंत्राच्या साहयाने बनलेल्या वस्तु हे अतीशय सुंदर व सुबक असल्यामुळे भारतातील प्रसीध्द असलेला कापड व्यवसाय हा या यंत्राच्या साहयाने तयार झालेल्या

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

कापडासमोर टिकाव धरू शकला नाही. परिणामी भारतातील हे कुटीर उद्योग हळूहळू बंद झाले. त्यामुळे अश्या या घरघुती उद्योगात काम करणारे मजूर हे बेकार झाले व त्यामुळे औद्योगिक कामगार वर्ग उदयास आला.

**शेतीचे व्यापारीकरण :-**

इंग्लंडमध्ये लागणाऱ्या कच्च्या मालासाठी भारतीयांवर दबावाने शेतीतून नगदी पीके घेण्यावर प्रतीबंध लावण्यात आले. त्यामुळे शेतातून बाजरी, ज्वारी हया अन्नधान्याचे उत्पादन न घेता चहा, तंबाखु, निळ याचे उत्पादन घेण्यास भाग पाडायचे. परिणामी अन्नधाण्यानी सपन्न असलेला भारत भुकेकंगाल बनला. इंग्रजांमुळे शेतीतून येणारे पिक हे नगदी स्वरूपाचे झाले. शेतीचे व्यापारिकरण हे देखील औद्योगिक कामगार वर्गाचे उदयाचे महत्वाचे कारण बनले.

**अन्न-धान्याची टंचाई :-**

शेतामध्ये अन्न उत्पादन करण्याचा वाव होता. मात्र त्याच्या किंमती हया इतर नगदी पिकांच्या किंमतीपेक्षा कमी होत्या. तसेच त्या निर्यात केल्यामुळे त्यांना भाव चांगला मिळायचा म्हणून शेतकऱ्यांनी कमी मेहनतीचे नगदी पिके उत्पादनावर भर घातला त्यात चहा, तंबाखु, निळ इत्यादी पीकांचा समावेश होता. त्यामुळे लोकसंख्येच्या प्रमाणात अन्नधान्ये कमी पडू लागले. त्यामुळे पोट भरण्यासाठी कामगार वर्ग कारखान्यात काम करू लागला आणि त्यातुनच औद्योगिक कामगारांचा उदय झाला.

**वाढते दुष्काळ :-**

भारतामध्ये नियीमत पाऊस न पडल्यामुळे तसेच शेतीच्या व्यापारीकरणामुळे अन्न-धान्याची टंचाई झाली परिणामी देशामध्ये ठिकठिकाणी दुषकाळ पडू लागला. प्राणहानी होऊ लागली. त्यापासून बचाव करण्यासाठी ग्रामीण भागातील तरूण हे शहरी विभागाकडे स्थलांतर करू लागले. त्यामुळे हया दुष्काळापासून निघण्यासाठी धडपड करणाऱ्या औद्योगिक कामगार वर्गाचा उदय घडून आला.

**खेडयांचे स्वातंत्र्य नष्ट :-**

पुर्वी खेडी ही स्वयंपुर्ण असुन त्यांना कुठेही जाण्याची आवश्यकता नव्हती त्यांचा उदरनिर्वाह अतिशय व्यवस्थीतरित्या चालत होता. मात्र इंग्रजांच्या औद्योगिक विकासाच्या अवलंबनामुळे खेडयांमध्ये शेतात पीक घेण्याचे प्रकार बदलले आता शेतीमध्ये अन्न-धान्याऐवजी नगदी पिके घेण्यावर भर घातला जाऊ लागला. त्यामुळे खेडयाचे जे स्वातंत्र्य होते ते नष्ट होऊन तेथील बेकार झालेली जनता ही भटकू लागली. परिणामी औद्योगिक कामगार वर्ग उदयास होण्यास हातभार लागला.

**दळणवळणातील सुधारणा :-**

इंग्रजांनी भारतामध्ये भारतीयांचा विकास करण्याच्या नावाने रेल्वेचा विकास केला मात्र ते देखील त्यांना ज्या ठिकाणी मालाची ने-आन करण्यासाठी रेल्वेचा उपयोग होईल अशा ठिकानीच केला मात्र खेडयांचा विकास व्हावा म्हणून रस्तेबांधणीकडे लक्ष मात्र दिले नाही. त्यामुळे भारतातील दळणवळणाचा विकास हा नावापुरताच होता.

**ब्रिटीशांचे आर्थिक धोरण :-**

ब्रिटीशांनी भारतामध्ये औद्योगिकरण करण्यास सुरूवात केली तेव्हा विकास म्हणून निरनिराळया कंपनीचे धोरण आखले तेव्हा हया कंपण्यामध्ये लागणारे मजुर वर्ग त्यांना आपल्या देशातून आणणे परवडणार नव्हते तेव्हा त्यांनी भारतीयांनाच अगदी कमी पगारावर आपल्या कंपन्यामध्ये मजुर म्हणून ठेवले. मात्र त्यांना कोणत्याही विषयाबद्दल माहिती होऊ दिली नाही. तसेच त्यांना पदोन्नती देखील दिली नाही. त्यामुळे त्यांचा मजुर म्हणुन उल्लेख होऊ लागला. अश्याप्रकारे ब्रिटीशांनी

नावापुरताच आर्थीक धोरण आखले होते. त्यामुळे हा औद्योगिक कामगार वर्ग उदयास आला.

**बेकारीची समस्या :-**

भारतातील जनतेमध्ये औद्योगिक क्रांतीमुळे होणाऱ्या व्यापाऱ्यांची आवड निर्माण झाली. त्यामुळे त्यांचे कुटीर उद्योग, हस्त उद्योग व कर्ज बाजारीपणामुळे शेतीसुध्दा बंद केली. परिणामी देशामध्ये अन्न-धान्याची टंचाई भासु लागली. वारंवार पडणारे दुषकाळ यामुळे प्राणहानी होऊ लागली. त्यामुळे खेडी ओस पडू लागली तेव्हा जनता ही बेकार होऊन त्यांच्यात बेकारीची समस्या वाढू लागली. शरीरात मेहनत करण्याची ताकद असुन, करण्यासाठी काहीच कामे नसल्याने बेकारी वाढत गेली. परिणामी औद्योगिक कामगार वर्गाचा उदय झाला.

**औद्योगिक क्रांती :-**

देशातील तरूण वर्ग तसेच बेकार झालेला वर्ग देखील भारतामध्ये होणाऱ्या हया इंग्रजांच्या औद्योगिक क्रांतीमध्ये हातभार लावू लागला. हया औद्योगिक क्रांतीमुळे कामगार वर्गाचा उदय होण्यास हातभार लागला.

**कामगार वर्गाचा उदय :-**

भारतामध्ये हया औद्योगिक क्रांतीमुळे तसेच निरनिराळया कंपन्यामुळे कामगार वर्ग तयार झाला शेती व घरघुती उद्योग न करता कंपनीमध्ये कामगार म्हणुन कार्य करून आपले उदरनिर्वाह करणाऱ्या वर्गामध्ये वाढ झाली. परिणामी खेडी ही ओस पडू लागली. खेडयातील स्वयंपुर्णतः नष्ट होऊन भारत हा दुसऱ्यांवर अवलंबुन राहणारा देश बनला. भारतीयांचा विकास हा नावापुरताच असून आपली गरज भागविण्यासाठी इंग्रज त्यांच्याकडुन कामे करून घेत असत. इंग्रजांचा विकास होत गेला व भारतीय पुन्हा - पुन्हा मागे पडत राहीले. अश्याप्रकारे औद्योगिक कामगारांचा वर्ग उदयास येण्यास हातभार लागला.

**सारांश :-**

सकाळी सोन्याचा धुर निघणारा भारत भिकेकंगाल बनला. ज्या भारत मातेच्या दुधावर इंग्रज दृष्ट बनले. त्या मातेच्या लेकरांवर उपासमारीची पाळी आली. इंग्रजांना व्यापार करण्यासाठी अनुकूल वातावरण भारतात निर्माण झाले. भारत खनिज संपत्तीने सुजलाम - सुफलाम होता. भारतात भरपूर खानी होत्या. हया खानितून निघणारा व इतरही कच्चा माल अतिशय कमी किंमतीला भारतातून इंग्लडला नेत आणि त्याचे यंत्राच्या साह्याने पक्क्या मालात रूपांतर करूण तोच माल भारतात आणून जास्तीत जास्त किंमतीला विकत व भरपूर प्रमाणात नफा कमवत याला दादाभाई नौरोजीनी आर्थिक निसःरणाचा सिध्दांत म्हटले आहे. इंग्रजी मालाला जास्त मागणी असल्यामुळे भारतीय माल मागे पडला परिणामी लघुउद्योग व कुटीरउद्योग मागे पडून भारतीय कारागीर बेकार झाले म्हणून ते शेतीकडे वळले मर्यादीत शेती एकापेक्षा अनेक लोकांत वाटल्यागेल्यामुळे व शेतीला लागणारा पैसा शेतकऱ्यांकडे नसल्यामुळे ते सावकारांच्या पाशात सापडले व परीणामी कर्ज न चुकवता आल्यामुळे शेती गमवावी लागली व परिणामी भूमीहीन बनावे लागले. पोट भरण्यासाठी शेतकऱ्यांना इंग्रजांकडे जावून काम करावे लागले. अश्याप्रकारे औद्योगिक कामगारांचा उदय झाला.

**निष्कर्श :-** व्यापारासाठी शोतातून पिकाचे उत्पादन म्हणजेच शेतीचे व्यापारीकरण होय. भारत इंग्रजांचा गुलाम असल्यामुळे चहा, कॉफी, नीळ, तंबाखु, ताग, कापूस, ऊस, शेंगदाणे आणि तीळ इ. नगदी पिके घेण्यास भाग पाडत त्यामुळे अन्नधान्यांचा तुटवडा भासू लागला. खेडयाची स्वयंपूर्णता नष्ट झाली. शेतीच्या व्यापारी करणामुळे भारतीयांना फार मोठी हानी झाली. जिवनावश्यक धान्यांचे व कडधान्यांचे उत्पादक घटले. मुघल अमदानीत दोनवेहा पोटभर खाऊन पिऊन सुखी समाधानी असलेला शेतकरी परकीय ब्रिटीश राजवटीत भुकेकंगाल बनला. परंतू इंग्रजांना यांच्याशी काहीही

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

घेणदेण नव्हता. कारण भारत ही इंग्रजांची एक वसाहत होती. ब्रिटीश उद्योगधंद्याची विद्युतगतीने भरभराट झाली व त्याचा अप्रत्यक्षरित्या घातक परिणाम होऊन भारतातील उद्योगधंदे अविकसीत झाले व मोडकळीस आले.

ब्रिटीश राजवटीपूर्वी आर्थिकदृष्टया स्वावलंबी स्वतंत्र असलेल्या खेडयांची स्वयंपूर्णता रसातळाला गेली. ग्रामीण जीवन विस्कळीत झाले. खेडयांची स्पयंपूर्णता, एकजिन्सीपणा नष्ट होताच याचा घातक परिणाम भारतीय समाजव्यवस्थेवर होवून ती कोलमडून पडली. ब्रिटीश राज्यकर्त्यांना हेच पाहिजे होते त्यामुळे ग्रामोव्दाराची कोणतीही योजना ब्रिटीश राज्यकर्त्यांनी कधीही राबविली नाही.

**उपाय :-**

इंग्रजांनी आपल्या देशावर 190 वर्षे राज्य केले. (इ.स.1757 च्या प्लासीच्या लढाईपासून तर इ.स.1947 पर्यंत) इ.स. 1600 मध्ये इंग्रज भारतात हातात तराजू घेवून व्यापार करण्यासाठी आले आणि व्यापार करता-करता भारताचे सत्ताधिश बनले. इंग्राजांनी इ.स. 1757 मध्ये ज्यावेळी सिरोजउद्दोला सोबत प्लासीची लढाई केली त्याचवेळी इंग्रजांच्या विरोधात सर्व भारतीयांनी सिरोज उद्दोलाला मद्दत केली असती, तर इंग्रजांना पराभव पत्करावा लागला असता. परंतू भारतीय राजे आपापसात लढण्यात धन्यता मानीत असत आपलाच प्रांत सुरक्षीत व स्वतंत्र ठेवून दुसऱ्यांचा प्रदेश कसा मिळवता येईल व ते मिळवण्यासाठी वेळप्रसंगी इंग्रजांनी मद्दत घेत. सर्व भारतीय सुरूवातीपासून एकत्र येवून इंग्रजांना विरोध केला असता तर कदाचीत परीणाम वेगळा झाला असता. हजारो वर्षाची भारतीय संस्कृती विसरून आपण 190 वर्शांची इंग्रजी संस्कृती लक्षात ठेवतो. आपल्याच कुटूंबीयांचा काटा काढण्याासठी दुसऱ्याची मद्दत घेतो ही फार मोठी दुर्देवी बाब आहे.

**संदर्भ सुची :-**


1) *आचार्य धनंजय : ''भारताचा इतिहास (1761 ते 1971)''साईनाथ प्रकाशन नागपूर प्रथमाकृती - 2009*

2) *डॉ. आठल्ये विभा. : ''आधुनिक भारताचा इतिहास'' (इ.स.1761 ते इ.स.1971) प्रकाशक संजय ठाकरे, प्रथम आवृत्ती 7/7/2009*

3) *डॉ. कोल्हारकर श.गो. : ''आधुनिक भारत'' (इ.स.1761 ते इ.स.1950) मंगेश प्रकाशन प्रथम आवृत्ती 2004*

4) *दिक्षित नी.सी. : ''आधुनिक भारत'' (इ.स.1760 ते इ.स.1950) पिंपळापुरे ॲण्ड क. पब्लिशर्स नागपूर प्रथम आवृत्ती 2003.*

5) *डॉ. वैद्ये सुमन : ''आधुनिक भारताचा इतिहास'' (इ.स.1757 ते इ.स.1857) डॉ. कोठेकर शांता श्री साईनाथ प्रकाशन नागपूर आवृत्ती 9 2015*